# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## **विद्यार्थी विकास मंडळ**

परिपत्रक क्र. २३१/२०१९

''श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदक २०१९–२०''

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना (विद्यार्थीनीकरिता)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठ विभागातील कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या **विद्यार्थीनीस** २०१६ पासून दरवर्षी 'श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदक' प्रदान करण्यात येत आहे. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थीनीस विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येते.

या परिपत्रकाद्वारे सर्व प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख/समन्वयक यांना कळविण्यात येते की, 'श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदका' साठी खाली उल्लेख केलेल्या नियम व अटीनुसार विद्यार्थीनीची माहिती आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **सोमवार, दि. ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत** संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावे. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदकाकरिता आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करून आणि सर्वांगीण विचार करून विद्यार्थीनीचे नाव कळविणे आवश्यक आहे.

नियम व अटी :

१) सदर सुवर्णपदक 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या **एका विद्यार्थिनींस** प्रदान करण्यात येईल.

२) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीचा कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत नियमित किमान २ वर्षे सहभाग असावा .

३) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनींने अध्यादेश क्रमांक १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीने महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास नियमित प्रवेश घेतलेला असावा.

५) अध्यादेश क्रमांक १६८ नुसार परीक्षेस बसणारी वा उत्तीर्ण होणारी विद्यार्थीनी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

६) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीची नियमित अभ्यासक्रमात आणि कमवा व शिका योजनेतील उपस्थिती किमान ७५ टक्के असणे आवश्यक राहील. या संदर्भात मा. प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

७) विद्यार्थीनीस गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

८) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमांतील सहभाग उदा. अभ्यासेतर उपक्रम, क्रीडा, समाजसेवा, कला, देशभक्तीपर उपक्रम, राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.), राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.), इ. विविध क्षेत्रातील कामगिरी/नैपुण्य विचारात घेण्यात येईल.

९) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीची निवड करण्याकरिता महाविद्यालयीन पातळीवर मा. प्राचार्य यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करुन अर्जाची छाननी करावी.

१) मा. प्राचार्य (अध्यक्ष)

२) महाविद्यालयाच्या विविध शाखांच्या तीन प्राध्यापिका

३) विद्यार्थी कल्याण अधिकारी (सचिव)

१०) प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्थेने/विद्यापीठ विभागाने आपल्या कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेतून सर्वोत्तम असे एकाच विद्यार्थीनीचे नाव कळवावे.

११) विहित कालावधीत आणि विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

वरील नियम व अटी यांची पूर्तता न करणारे अर्ज बाद ठरविण्यात येतील.

**विद्यार्थी विकास मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ७
संदर्भ क्र. :२०१९–२०/४२९
दिनांक : ०५ सप्टेंबर, २०१९

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदक २०१९–२०

## : प्रस्ताव नमुना :

१) विद्यार्थीनींचे नाव : ............................................................
मोबाइल क्र. : ............................................................
ई–मेल आयडी : ............................................................
वर्ग व विद्याशाखा : ............................................................

२) महाविद्यालय/विभाग नाव व पत्ता : ............................................................
............................................................
महाविद्यालय/विभाग ई–मेल आयडी: ............................................................

३) प्राचार्य/ विभागप्रमुख नाव : ............................................................

प्राचार्य/ विभागप्रमुख मोबाईल क्र.: ............................................................

४) अध्यादेश क्रमांक १०९, ११०,
व १४३ ची पूर्तता केला आहे का ? होय ☐ नाही ☐

५) अध्यादेश क्रमांक १६८ नुसार : होय ☐ नाही ☐
परीक्षेस बसली आहे का ?

४) योजनेत २ वर्षे नियमित सहभाग: होय ☐ नाही ☐

५) ७५ टक्के उपस्थिती : होय ☐ नाही ☐
(सोबत मा. प्राचार्याचा दाखला जोडावा)

६) गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार
इ. बाबत शिक्षा झाली आहे का ? होय ☐ नाही ☐

७) क्रीडा क्षेत्रातील कामगिरीबाबत माहिती : १. ....................................................
(प्रमाणपत्र/प्रशस्तिपत्र जोडणे आवश्यक) २. ....................................................
३. ....................................................

८) कला क्षेत्रातील कामगिरीबाबत माहिती : १. ....................................................
(प्रमाणपत्र/प्रशस्तिपत्र जोडणे आवश्यक) २. ....................................................
३. ....................................................

९) राष्ट्रीय सेवा योजना कामगिरीबाबत माहिती: १. ....................................................
(प्रमाणपत्र/प्रशस्तिपत्र जोडणे आवश्यक) २. ....................................................
३. ....................................................

१०) राष्ट्रीय छात्र सेना कामगिरीबाबत माहिती: १. ....................................................
(प्रमाणपत्र/प्रशस्तिपत्र जोडणे आवश्यक) २. ....................................................
३. ....................................................

११) अभ्यासेतर उपक्रमाबाबत माहिती : १. ....................................................
(प्रमाणपत्र/प्रशस्तिपत्र जोडणे आवश्यक) २. ....................................................
३. ....................................................

(स्वाक्षरी)
विद्यार्थींनी

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख, यांचेमार्फत शिफारशीनुसार सादर :

प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
स्वाक्षरी व शिक्का